दैनिक बीड लोकनेता
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सोमवार दि.३ मार्च २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
-ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१६९ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# सावंतांनी मंजूर केलेल्या आरोग्य विभागाच्या ३२०० कोटी रुपयांच्या कामांना स्थगिती

## फडणवीसांचा एकनाथ शिंदेंना पुन्हा झटका



लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुन्हा एकदा माजी मंत्र्यांना झटका देत आरोग्य विभागातील ३२०० कोटी रुपयांच्या कामांना स्थगिती दिली आहे. या कामांसाठी काढलेल्या टेंडरची रक्कम फुगवण्यात आली असून यात घोटाळा झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. त्यामुळे आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा एकनाथ शिंदे यांच्या मंत्राला दिलेला मोठा झटका मानला जात आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मागील सरकारच्या कार्यकाळात झालेल्या कामांना स्थगिती देण्याचा सपाटा लावला असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे यातील अनेक कामे ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षातील सहकारी मंत्र्यांची आहेत. यामध्ये आता माजी आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्या आरोग्य विभागातील तीन हजार दोनशे कोटी रुपयांच्या कामांना फडणवीस सरकारने स्थगिती दिली आहे. आरोग्य मंत्रालयाच्या अखत्यारीत असलेल्या सर्व शासकीय रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्रांची बाह्य यंत्रणेद्वारे तांत्रिक पद्धतीने साफसफाई करण्यासाठी वार्षिक ६३८ कोटी याप्रमाणे पाच वर्षांसाठी सुमारे ३ हजार १९० कोटी रुपयांची कामे तानाजी सावंत यांनी पुण्यातील एका खासगी कंपनीला मंजूर केली होती. ३० ऑगस्ट २०२४ रोजी या निर्णयाला मंजुरी देण्यात आली होती. मात्र आता या निर्णयाला स्थगिती देण्यात आली आहे.या संबंधात करण्यात आलेल्या आरोपांनुसार ज्या कंपनीला तांत्रिक साफ सफाईच्या कामांचा कोणताही अनुभव नाही, तरी देखील त्या कंपनीला राज्यभरातील रुग्णालयांची जबाबदारी देण्यात आली होती. विशेष म्हणजे या आधी या कामासाठी वर्षाला केवळ ७० कोटी रुपये खर्च येत होता. तो खर्च देखील वाढवण्यात आला होता. तांत्रिक पद्धतीने स्वच्छता करण्यासाठी आवश्यक असलेला निधी राज्यस्तरावर उपलब्ध नाही. तो उपलब्ध होईपर्यंत नव्याने स्वच्छता सेवा सुरू करण्याबाबत कोणतेही कार्यवाही देखील करण्यात येऊ नये, असे निर्देश आरोग्य सेवा आयुक्तालयाने दिले आहेत.इतकेच नाही तर कोणत्याही रुग्णालयात विना परवानगी नव्याने स्वच्छता सेवा सुरू होणार नाही, याची खबरदारी घेण्यात यावी, असे निर्देश देखील आरोग्य सेवा उपसंचालक यांनी सर्व जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणांना दिले आहेत. वास्तविक राज्यभरातील रुग्णालयाच्या स्वच्छतेसाठी वर्षाकाठी केवळ ७० कोटी रुपये म्हणजेच पाच वर्षासाठी ३५० कोटीच्या जवळपास खर्च अपेक्षित आहे. तरीदेखील या कामासाठी ३२०० कोटी रुपयांचे अंदाजपत्रक दाखवत निविदा काढल्या गेल्याचे समोर आले आहे. त्यामुळेच या कामाला स्थगिती दिली असल्याची चर्चा आता सुरू झाली आहे.

## मुदखेड तालुक्यात रेती अवैध मार्गाने, वाहतूक सुरूच महसूल प्रशासनाची डोळेझाक

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुदखेड । किशोर मुंगल**



तालुक्यातील आमदुरा, येळी, महाटी, शंखतीर्थ, शिकारघाट, वासरी देवापुर या भागात रेती माफियांनी नियमांची पायमल्ली करत अवैध रेती उपसा व वाहतुकीचा कळस गाठला आहे. अवैधरित्या नदी कोरून चांगभलं करून घेणाऱ्या या माफियांकडे प्रशासनाने डोळेझाक केली असल्याचे दिसून येत आहे.आवश्यक परवानगी न घेता व कुठलेही महसूल न भरता, परवानगी पेक्षा जास्त वाळू उपसा करून मुदखेड सह हदगाव, हिमायतनगर उमरी व इतर तालुक्यांमध्ये अवैध वाळू वाहतूक वाळू माफिया कडून केल्या जात आहे.वाळू माफियांकडून,

अवैधरित्या विना नंबर प्लेट किंवा वेगवेगळे नंबर प्लेट वापरून टिप्परच्या सहाय्याने वाहतूक केल्याचे निदर्शनास येत आहे. पुढील नंबर प्लेट एक व मागील बाजूचा दुसरा अशाप्रकारे बनावट किंवा नकली नंबर प्लेट वापरून वाळूची वाहतूक होत आहे. 'एम-एच-५५' हा नंबर असलेले मुंबई भागातील नंबर प्लेट या वाहनांवर दिसतात. दुचाकी-चारचाकी वाहनांकडे लक्ष असलेल्या राज्य परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांना मोठी वाहने नजरेस येत नाहीत का? हा प्रश्न तूर्तास अनाकलनीय आहे. भरधाव वेगाने सदर वाळू वाहतूक होत असल्यामुळे अपघाताची शक्यताही वर्तवल्या जात आहे.

गृह, महसूल व परिवहन प्रशासनाने एकत्रितपणे या अवैध धंद्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. राज्याचे महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यातील वाळूच्या अवैध धंद्यांना रोखण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले होते, त्याबरोबर जिल्हा नियोजन बैठकीत पालकमंत्री ना.अतुल सावे यांनीही हा प्रश्न गंभीरतेने घेतला आणि कर्तव्यदक्ष म्हणून सर्वश्रुत असलेले जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांची नांदेड येथे नियुक्ती झाल्याने जनतेच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. महसूल प्रशासनाने डोळेझाक केली असल्याचे दिसून येत आहे.

## दैनिक लोकनेताच्या बातमीची बाग पुणे महानगर पालिकेलाआली जाग


06 Feb 2025
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
दैनिक लोकनेता
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे
Powered by - epaper.lokneta.in

**वाघोलीत प्रवाशांसाठी बांधलेल्या सार्वजनिक शौचालयाची दुरावस्था**

लोकनेता न्यूज नेटवर्क
वाघोली । संतोष कदम

वाघोलीतील पीएमपीएल बस स्थानकालगत असलेल्या सार्वजनिक शौचालयाची दुरावस्था झाली आहे. शौचालयाचे दरवाजे तुटलेल्या अवस्थेत असून सांडपाणी रस्त्यावर येत आहे.यामुळे याची दुर्गंधी बस स्थानकात पसरली आहे. स्वच्छतागृहात पाणी नसल्यामुळे घाण पसरली आहे. प्लॅस्टिक बाटल्यांचा खच पडल्यामुळे नागरिकांची गैरसाय होत आहे. पालिकेने दुर्लक्ष केल्यामुळे मधुमेह रुग्णांसह बस स्थानकातील प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. पालिकेने याकडे तातडीने लक्ष घालून सार्वजनिक शौचालयाची ... अशी मागणी प्रवासी आणि आजबाजूच्या व्यवसायकांकडून केली जात आहे.बस स्थानकातील प्रवाशी, कर्मचारी यांच्यासाठी सार्वजनिक शौचालय पालिकेच्या वतीने बांधण्यात ... वर्दळ असते. वाहतूकही मोठ्या प्रमाणात असते.
या सार्वजनिक शौचालयांचे दरवाजे गायब झाले आहेत. शौचालयात सांडपाणी साचल्याने दुर्गंधी पसरली आहे. गेल्या ... येत असल्याने नागरि... आरोग्याचा प्रश्न निर्माण झा... पालिका प्रशासनाने दुर्लक्ष ... नागरिकांमध्ये संताप व्य... जात आहे. माय माऊलींची कुचंबना




लोकनेता न्यूज नेटवर्क

**वाघोली । संतोष कदम**

वाघोलीतील पीएमपीएल बस स्थानकालगत असलेल्या सार्वजनिक शौचालयाची दुरावस्था झाली होती.शौचालयाचे दरवाजे तुटलेल्या अवस्थेत होते सांडपाणी रस्त्यावर येत असल्यामुळे याची दुर्गंधी बस स्थानकात पसरली होती.

स्वच्छतागृहात पाणी नसल्यामुळे घाण पसरली होती प्लॅस्टिक बाटल्यांचा खच पडल्यामुळे नागरिकांची गैरसाय होत होती.पालिकेने दुर्लक्ष केल्यामुळे मधुमेह रुग्णांसह बस स्थानकातील प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत होता.पालिकेने याकडे तातडीने लक्ष घालून सार्वजनिक शौचालयाची साफसफाई करून डागडुजी करावी, अशी मागणी प्रवासी आणि आजबाजूच्या व्यवसायकांकडून केली जात होती. बस स्थानकातील प्रवाशी, कर्मचारी यांच्यासाठी सार्वजनिक शौचालय पालिकेच्या वतीने बांधण्यात आले आहे.त्यामुळे नागरिकांची नेहमीच वर्दळ असते. वाहतूकही मोठ्या प्रमाणात असते.

**“ नागरिकांनी मानले दैनिक लोकनेताचे आभार**
**या सार्वजनिक शौचालयांचे दरवाजांची मोडलेली अवस्था यामुळे प्रवाशांची कुचंबना होत होती.शौचालयात सांडपाणी साचल्याने दुर्गंधी पसरली होती मलमूत्र बाहेरील रस्त्यावर येत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला होता .आमच्या प्रतिनिधीकडे नागरिकांनी या व्यथा मांडल्या होत्या. याचे सविस्तर वृत्त प्रसिद्ध होताच महानगरपालिका प्रशासन खडबडून जागे झाले. संबंधीत वृत्त दैनिक लोकनेताने सडेतोड भूमिका घेऊन मांडल्याने नागरिकांनी दैनिक लोकनेता न्यूज नेटवर्कचे आभार मानले.**






# शिवाजी विद्यापीठ नामांतराचा नवा गोंधळ: दिशाभूल करणारी राजकीय खेळी

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

शिवाजी विद्यापीठाच्या नामांतराचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. महाराष्ट्रातील काही तथाकथित विचारवंत आणि राजकीय नेत्यांनी या विषयावर मोठा गदारोळ माजवला आहे. विद्यापीठाच्या नावात छत्रपती आणि जिजाबाई यांचा समावेश केला पाहिजे, असा आग्रह धरला जात आहे. मात्र, हा बदल आवश्यक आहे का? की हा केवळ एक राजकीय डाव आहे? आजच्या घडीला शिक्षणाच्या क्षेत्रात अनेक गंभीर समस्या आहेत, पण त्याकडे दुर्लक्ष करून केवळ नाव बदलण्याच्या वादातच लोकांना गुंतवून ठेवले जात आहे.

**नामांतरावर राजकारण का?**

शिवाजी विद्यापीठ हे १९६२ पासून कार्यरत आहे आणि त्याने हजारो विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी दिली आहे. शिवाजी या नावातच महाराजांचा इतिहास आणि त्यांचा प्रभाव दडलेला आहे. मग आता अचानक छत्रपती शिवाजी महाराज किंवा छत्रपती शिवाजी जिजाबाई शहाजी विद्यापीठ असे नाव ठेवण्याचा आग्रह का? यामागे काही ठराविक गटांचे राजकीय हितसंबंध दिसून येतात.राजकीय पक्षांना भावनिक मुद्दे निर्माण करून जनतेचे लक्ष खऱ्या प्रश्नांवरून हटवायचे असते. शिक्षण क्षेत्रात सुधारणा करणे, संशोधनाला गती देणे, विद्यार्थ्यांना उत्तम सुविधा उपलब्ध करून देणे, यावर लक्ष केंद्रित करण्याऐवजी केवळ नावात बदल केल्याने काहीच साध्य होणार नाही. विद्यापीठाच्या नावात फेरफार केल्याने शिक्षणाची गुणवत्ता सुधारेल का? संशोधनाला चालना मिळेल का? की फक्त काही नेत्यांचे राजकीय हेतू पूर्ण होतील?

**भावनिक वाद आणि दिशाभूल करणारा प्रचार**

या नामांतराच्या बाजूने असलेले लोक असा प्रचार करत आहेत की शिवाजी विद्यापीठ असे म्हणणे हा छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान आहे. हा तर्कच चुकीचा आहे. शिवाजी विद्यापीठाची स्थापना ही महाराजांच्या कार्याचा सन्मान करण्यासाठीच झाली होती. जर हे नाव अपमानास्पद असते, तर गेल्या सहा दशकांपासून यावर कोणी प्रश्न उपस्थित का केला नाही?छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य महान आहे आणि त्यांचे योगदान अमूल्य आहे. त्यांच्या मातोश्री जिजाबाई यांचे योगदानही मोठे आहे. मात्र, त्यांचे महत्त्व वाढवण्यासाठी केवळ नाव बदलणे हा काही उपाय नाही. शिवाजी महाराजांचा वारसा आपण त्यांच्या विचारांवर चालून जपला पाहिजे, केवळ घोषणाबाजी करून नव्हे.

**शिक्षण क्षेत्रातील खऱ्या समस्या**

महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेमध्ये अनेक गंभीर समस्या आहेत. सरकारी विद्यापीठांना पुरेसं अनुदान मिळत नाही, संशोधन क्षेत्राकडे लक्ष दिलं जात नाही, विद्यार्थ्यांना अद्ययावत अभ्यासक्रम आणि तंत्रज्ञानाची जोड मिळत नाही. यावर उपाय शोधण्याऐवजी राजकीय नेते केवळ नावांवर वाद घालत आहेत.विद्यापीठांना जागतिक दर्जाच्या संशोधन संस्थांमध्ये स्थान मिळावे, विद्यार्थी उद्योजकता आणि नावीन्यपूर्ण विचारसरणीकडे वळावेत, शिक्षणाची गुणवत्ता सुधारावी, यासाठी कुठलेही प्रयत्न होत नाहीत. मात्र, नावे बदलण्यावर खर्च करण्यास हेच नेते पुढे सरसावतात.

**सतत नाव बदलण्याचा फोलपणा**

नावे बदलल्याने इतिहास बदलत नाही, तो कार्यातून घडतो. काही वर्षांपूर्वी औरंगाबादचे छत्रपती संभाजीनगर आणि उस्मानाबादचे धाराशिव असे नामांतर करण्यात आले. पण त्यामुळे त्या शहरांचा विकास झपाट्याने झाला का? तिथल्या नागरी सुविधांमध्ये फरक पडला का? उत्तर स्पष्ट आहे–नाही.त्याचप्रमाणे, विद्यापीठांच्या नावांमध्ये फेरफार केल्याने काही बदल होणार नाही. याउलट, हजारो कागदपत्रे, प्रमाणपत्रे आणि दस्तऐवजांमध्ये फेरफार करावा लागेल. प्रशासनावर अतिरिक्त आर्थिक भार पडेल, आणि यातून काहीही साध्य होणार नाही.

**खरा शिवसन्मान: शिक्षण आणि प्रगती**

शिवाजी महाराजांनी युद्ध कौशल्य, प्रशासन आणि उत्तम धोरणांनी एक सामर्थ्यशाली स्वराज्य उभं केलं. त्यांनी शिक्षणाला महत्त्व दिलं, सैन्याला आधुनिक साधनसामग्री उपलब्ध करून दिली आणि योग्य धोरण आखून स्वराज्य बळकट केलं. आज आपण जर त्यांना खरी आदरांजली वाहायची असेल, तर त्यांच्याच विचारधारेनुसार शिक्षण, संशोधन, रोजगार आणि उद्योजकतेला चालना द्यावी लागेल.राजकीय पक्षांनी केवळ घोषणाबाजी करून महाराजांचे नाव वापरणे थांबवावे. विद्यार्थ्यांसाठी अधिक संशोधन सुविधा, आधुनिक प्रयोगशाळा, आणि जागतिक दर्जाचे शिक्षण देण्यावर भर द्यावा. विद्यापीठांचे नाव बदलून नव्हे, तर शिक्षण व्यवस्था सुधारूनच शिवाजी महाराजांना खरी श्रद्धांजली वाहता येईल.

**सततच्या वादांमुळे नुकसान कोणाचे?**

शिवाजी महाराजांच्या नावाचा वारंवार वापर करून राजकीय पक्ष केवळ आपली पोळी भाजून घेत आहेत. मात्र, त्यामुळे खऱ्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत आहे. शिक्षण व्यवस्था सुधारण्यावर लक्ष केंद्रित करण्याऐवजी लोकांना भावनिक मुद्द्यांमध्ये अडकवून ठेवले जात आहे.विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधनाला चालना, आणि उद्योगधंद्यांसोबत समन्वय मिळावा, ही खरी गरज आहे. मात्र, नाव बदलण्यावर वाद घालणाऱ्या लोकांना याची फिकीर नाही. याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांवर, शिक्षकांवर आणि समाजावर होतो.एकुणच, शिवाजी विद्यापीठाच्या नामांतराच्या मागणीमागे शिक्षणाचा विकास किंवा समाजहित यापैकी काहीही उद्देश नाही. हा केवळ लोकांचे लक्ष मूळ समस्यांवरून हटवण्याचा राजकीय प्रकार आहे. नावे बदलून विकास होत नाही, तर कृतीने आणि सुधारण्यातून होतो.छत्रपती शिवाजी महाराजांनी कधीही अनावश्यक वादांना महत्त्व दिले नाही, त्यांनी प्रत्यक्ष कृती केली. त्यामुळे त्यांना खरी आदरांजली वाहायची असेल, तर शिक्षणाच्या क्षेत्रात अमूलाग्र सुधारणा कराव्या लागतील. केवळ नावावर चर्चा करून कोणताही बदल घडणार नाही. महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी, शिक्षण व्यवस्थेवर भर दिला पाहिजे, भावनिक राजकारणावर नाही!

**–डॉ. सुवर्णा कराड, शैक्षणिक व सामाजिक कार्यकता**

# मराठीसह संत साहित्य अत्याधुनिक यंत्रणेचा वापर करून जगभरात पोहोचवणार ; उदयजी सामंत

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**आळंदी देवाची । इम्रान हकीम :**





माऊली मंदिरात ओळख श्री ज्ञानेश्वरीची पुस्तक प्रकाशन सोहळा उत्साहात उद्योग व मराठी भाषा मंत्री उदयजी सामंत यांचे हस्ते प्रकाशन संत ज्ञानेश्वर महाराज सप्तशतकोत्तर सुवर्ण जन्मोत्सवी वर्ष उपक्रम आळंदी श्री संत ज्ञानेश्वर माऊली, श्री जगद्गुरु संत तुकाराम महाराज, संत नामदेवराय, संत बहिणाबाई आदी संतांचे साहित्य हे मराठी भाषेचे वैभव असून मराठी भाषा अभिजात भाषा आहे. या पुढील काळात जगभर जाण्यासाठी मराठीसह संत साहित्य ई बुक, डिजिटल स्वरूपात विकसित करण्याचा संकल्प असून येत्या पाच वर्षात संत तुकाराम महाराज यांची गाथा ही ई बुक मध्ये उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे प्रतिपादन उद्योग व मराठी भाषा मंत्री उदयजी सामंत यांनी केले.

संत ज्ञानेश्वर महाराज सप्तशतकोत्तर सुवर्ण जन्मोत्सवी वर्षानिमित्त श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमेटी व ओळख श्री ज्ञानेश्वरी परिवार यांच्या वतीने शालेय मुलांच्या मूल्य संवर्धनासाठी ओळख श्री ज्ञानेश्वरीची व परिचय भागवत धर्माचा ओळख ज्ञानेश्वरीची या दोन पुस्तकांचे प्रकाशन उद्योग व मराठी भाषा मंत्री ना. उदयजी सामंत यांचे हस्ते माऊली मंदिरात वारकरी संप्रदाया तील मान्यवरांचे साक्षीने धार्मिक मंगलमय वातावरणात झाला. ओळख श्री ज्ञानेश्वरी परिवाराचे वतीने श्री ज्ञानेश्वर महाराज मंदिरात पुस्तक प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

या प्रसंगी व्यासपीठावर श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजन नाथसाहेब, माजी प्रमुख विश्वस्त व विश्वस्त ॲड राजेंद्र उमाप, पालखी सोहळा प्रमुख व विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे,डॉ. नारायण महाराज जाधव, श्री ज्ञानेश्वर महाराज चरित्र समितीचे अध्यक्ष प्रकाश काळे, श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुरेश वडगावकर, संस्थानचे माजी विश्वस्त पुस्तकाचे लेखक, डॉ. अभय टिळक, लेखक सुभाष महाराज गेठे, वासुदेव महाराज शेवाळे, भागवत महाराज साळुंखे, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष भगवान पोखरकर, माजी नगराध्यक्ष बबनराव कुऱ्हाडे पाटील, माजी नगरसेवक डी. डी. भोसले पाटील, अशोक उमरगेकर, सामाजिक कार्यकर्त्या पुष्पाताई कुऱ्हाडे पाटील, मालन घुंडरे पाटील, सुवर्णाताई काळे, संजय महाराज घुंडरे पाटील, निलेश लोंढे महाराज भाजपचे केंद्रीय समिती सदस्य डॉ. रामशेठ गावडे, शहराध्यक्ष राहुल चव्हाण, कामगारनेते बाबा कांबळे, ओळख श्री ज्ञानेश्वरीची परिवारातील सर्व घटक, अध्यापक, संस्था चालक, मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षक, बाळासाहेब महाराज शेवाळे, वारकरी संप्रदायातील थोर कीर्तनकार, प्रवचनकार, भाविक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांचे हरिनाम गजरात माऊली मंदिरात औक्षण करीत स्वागत करण्यात आले. श्रींचे गाभाऱ्यात श्रींची पूजा, आरती, पसायदान झाल्यानंतर आळंदी देवस्थान तर्फे त्यांचा सर्व विश्वस्त यांचे हस्ते सन्मान करण्यात आला. त्या नंतर ओळख श्री ज्ञानेश्वरी परिवाराचे वतीने आयोजित पुस्तक प्रकाशन समारंभास श्रींचे ग्रंथ, श्रींची मूर्ती पूजन आणि दिपप्रज्वलन करीत प्रकाशन सोहळ्यास सुरुवात झाली.यावेळी प्रास्ताविकात प्रमुख विश्वस्त योगी निरंजन नाथसाहेब यांनी ओळख श्री ज्ञानेश्वरी या उपक्रमाची माहिती सांगत संवाद साधला. उपक्रमाचे महत्त्व लक्षात घेत देवस्थानाने या उपक्रमास पाठबळ दिले असून संत साहित्य सर्वदूर जाण्याचे दृष्टीने या उपक्रमास राजाश्रय मिळावा. प्रकाशित होत असलेली दोन पुस्तके नसून ही वाभावी ग्रंथ संपदा असल्याचे सांगत ते म्हणाले, शालेय मुलांचे अभ्यासक्रमात समाविष्ठ व्हावीत. अशी भूमिका मांडत संत साहित्य आणि मराठीचा गौरव अधिकाधिक व्हावा यासाठी ए आय सारखे अत्याधुनिक तंत्रज्ञान यासाठी वापरले जावे असे आवाहन त्यांनी केले. त्यांनी आरंभ–प्रारंभ आणि आमंत्रणे– निमंत्रणे यावर भाष्य करीत सुसंवाद साधला. यावेळी डॉ. अभय टिळक सुभाष महाराज गेठे, डॉ. भावार्थ महाराज देखणे यांनी मनोगते व्यक्त केली. ओळख श्री ज्ञानेश्वरीची हा शालेय मुलांसाठी मूल्य संवर्धनाचा, संस्कारक्षम मुले घडावीत यासाठी सुरु असलेला उपक्रम ७५ शाळांत सुरु असून हा उपक्रम सर्वदूर पोहोचावा. यासाठी सर्व शाळांनी या उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन आळंदी संस्थानचे विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे यांनी केले. या प्रकाशन सोहळ्यांत ओळख श्री ज्ञानेश्वरी या पुस्तकाचे लेखक ह.भ.प. सुभाष म. गेठे, ह.भ.प. वासुदेव म.शेवाळे, ह.भ.प. भागवत म. साळुंके, डॉ. अभय टिळक, उमेश महाराज बागडें यांचा सत्कार उद्योग मंत्री सामंत यांचे हस्ते करण्यात आला.उद्योग मंत्री उदय सामंत म्हणाले, संत ज्ञानेश्वर महाराजांची भाषा हि जगातील सर्व भाषांना मागे टाकणारी भाषा आहे. संतांचे साहित्य हे मराठी भाषेचे वैभव आहे. सर्व संत साहित्य ई–बुक, संत तुकाराम महाराज गाथेतील अभंग देखील डिजिटल माध्यमातून उपलब्ध करून देण्याचा मानस आहे. येत्या पाच वर्षांत संत तुकाराम महाराज गाथा ही ई–बुक मध्ये उपलब्ध करून देण्यात येईल. यासाठी सर्व वारकरी संप्रदायातील जाणकार मान्यवरांनी यासाठी अहंकारी करण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी त्यांनी या कार्यासाठी वारकरी संप्रदायातील सर्वांनी मदत करावी यासाठी शासन सर्वोतोपरी मदत करेल असे त्यांनी सांगितले. वारीत वारकरी कशाचीही तमा न बाळगता श्री विठ्ठल चरणी नतमस्तक होण्यासाठी येत असतात. त्यांची निष्ठा आपण सर्वांनी आत्मसात केली पाहिजे. मराठी भाषेचाप्रचार, प्रसार सर्व जगभर पोहोचविण्यास शासन कमी पडणार नाही. सर्व ते सहकार्य केरेलशी ग्वाही देत ते म्हणाले, येत्या काळात जगातील १०० देशांत मराठी भाषा मंडळांचे माध्यमातून मराठी भाषेचा गजर करायचा आहे. यासाठी अनेक उपक्रम असून यात श्रीक्षेत्र आळंदीत दरवर्षी दोन दिवशीय कीर्तन महोत्सव आयोजनाचा संकल्प त्यांनी जाहीर केला. येथील कीर्तन महोत्सवाची जगात दखल घेतली जाईल असा भव्य दिव्य कीर्तन महोत्सव घेतला जाईल. या ठिकाणी प्रकाशन सोहळ्यास येण्याचे भाग्य लाभल्याचे त्यांनी सांगितले. असे भाग्य सर्वांना लाभत नसल्याचे ही त्यांनी सांगितले. राज्य शासनाचे माध्यमातून तीर्थक्षेत्र विकासासाठी निधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून दिला जाईल अशी ग्वाही त्यांनी दिली. मराठी भाषा प्रचार, प्रसार करण्यासाठी विविध उपक्रम तसेच शालेय शिक्षण आणि संत साहित्यातून मुलांना संस्कारक्षम शिक्षण देण्यासाठी शिक्षण मंत्री यांचे समवेत लवकरच बैठक घेतली जाईल असे त्यांनी सांगितले.

या प्रकाशन सोहळ्यात उद्योग मंत्री सामंत यांचा विविध संस्था, पदाधिकारी यांनी सत्कार केला. यात श्री संत ज्ञानेश्वर महाराज थोरल्या पादुका देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ॲड विष्णू तापकीर, हराळे वैष्णव समाज धर्मशाळा आणि संत रोहिदास महाराज दिंडी क्रमांक २४, संत रोहिदास महाराज मठ आळंदी यांचे तर्फे देखील उद्योग मंत्री उदयजी सामंत यांचा सत्कार विना, संत तुकाराम महाराज यांची पगडी, तुळशी हार घालून कामगारनेते अध्यक्ष बाबासाहेब कांबळे, विश्वस्त तुषार नेटके, तुषार वायकुळे, शिवनाथ गायकवाड यांचेसह समाज बांधव यांनी केला. आळंदी ग्रामस्थांचे वतीने निलेश महाराज लोंढे कबीरबुवा यांचे मठात सत्कार व सद्दिच्छा भेट देण्यात आली. येथे ही सत्कार करण्यात आला. श्री ज्ञानेश्वर महाराज चरित्र समिती, ओळख श्री ज्ञानेश्वरी एक परिवार यांचे वतीने देखील सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे यशस्वीतेस संस्थानचे व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, उमेश बागडें, श्रीधर सरनाईक, अर्जुन मेदनकर, विश्वम्भर पाटील, प्राजक्ता हरफळे, सोपान काळे, धनाजी काळे, तात्या गवारी, बापू गोरे, धनाजी काळे, कैलास आव्हाळे आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन नरहरी महाराज चौधरी यांनी केले. श्री ज्ञानेश्वर महाराज चरित्र समिती अध्यक्ष प्रकाश काळे यांनी आभार मानले.

# आमदार असावा तर प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या सारखा भोपाळ वाडी फाटा येथील रस्ता दुरुस्तीची मागणी करताच केली कामाला सुरुवात

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**नांदेड । बाजीराव पाटील गायकवाड**





कलंबर खुर्द येथून जवळच असलेल्या भोपाळवाडी फाटा श्री छत्रपती संभाजी महाराज चौक ते कंधार/लोहा रोड बिदर हायवे बायपास रस्ता दुरुस्तीची मागणी करताच आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब यांनी रस्त्याच्या कामाला ताबडतोब सुरुवात केली आहे. भोपाळवाडी फाटा व कलंबर खुर्द/कलंबर बु.परिसरातील नागरिकांमध्ये बोलल्या जात आहे की आमदार असावे तर प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब यांच्या सारखे मागणी करतात काम करतात सुरू.सविस्तर वर्त असे आहे की कलंबर परीसरातील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित दादा पवार) पक्षाच्या कार्यकर्त्यांनी व परिसरातील नागरिकांनी भोपाळवाडी फाटा येथील बाजार पेठेतील रस्ता दुरुस्तीचे निवेदन देऊन मागणी केली होती.त्या मागणीची दखल घेऊन कर्तव्यदक्ष आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब यांनी ताबडतोब रस्त्याच्या कामाला सुरुवात केली आहे. त्याबद्दल कलंबर परिसरातील नागरिकांमध्ये आनंद व्यक्त केला जात असून प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब यांचे आभार मानले आहेत.यावेळी विठ्ठल भिमराव घोरबांड, सुधाकर शिंदे,जिवन भोपाळे, उत्तम पाटील घोरबांड, आनंद भोकरे, संभाजी घोरबांड, नागनाथ वारकड,उमेश भगीले, संदिप कांबळे, चंद्रकांत रूद्रकंठवार,गौस गादीवाले,हादी पाशा, गंगाधर हानवते, तिरुपती घोरबांड, चंद्रकांत कोंडामंगले , गजानन जाधव , गजानन पाटील घोरबांड यांनी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब यांच्या नावाने नारे देत आनंद व्यक्त करीत साहेबांचे आभार मानले आहेत.तसेच दैनिक लोकनेता पेपर चे मुख्य संपादक ज्ञानेश्वर बुधवंत साहेब, संपादक ज्ञानेश्वर मुंडे साहेब, मराठवाडा विभागीय संपादक बाजीराव पाटील कळकेकर यांनी या रस्त्याच्या बातम्या लावून सहकार्य केल्याबद्दल त्यांचे ही परीसरातील जनतेनी आभार मानले आहेत.



# सर्वधर्मीयांचे श्रध्दास्थान सुफी संत शेख महंमद बाबा यांचा दि १० रोजी ४०७ वा संदल-उरुस यात्रा उत्सव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**





छत्रपती शिवाजी महाराज यांचे आजोबा श्रीमंत मालोजी राजे भोसले यांचे गुरू सर्वधर्मीयांचे श्रद्धास्थान सुफी संत शेख महंमद बाबा यांचा ४०७ वा संदल- उरुस, यात्रा उत्सव दि. १० मार्च २०२५ रोजी होणार असुन त्या निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे शेख महंमद बाबा यांचे वंशज व शेख महंमद बाबा ट्रस्ट चे अध्यक्ष आमीनभाई शेख यांनी पत्रकार परिषदेत बोलताना सांगीतले.

पुढे बोलताना शेख म्हणाले की, हा संदल-उरुस, यात्रा उत्सव पारंपारीक पद्धतीने दरवर्षी मोठ्या उत्सवाने साजरा करण्यात येतो. हा. उत्सव सर्व धर्मीय बांधव मोठ्या उत्सहात साजरा करतात, या उत्सवा दिवशी पोलीस प्रशासनाची मानाची चादर बाबांच्या कबरीवर चढवली (अर्पण) केली जाते. तसेच संदल-उरूस, यात्रा निमित्त श्रीगोंद्यासह राज्यातून हिंदू-मुस्लिम भाविक भक्त मोठ्य प्रमाणात दर्शनासाठी (जिआरत) येतात. भाविक वाजत-गाजत चादर, शेरणी, नवैद्य अर्पण करून भावीक आपले नवस फेडतात.

शेख महंमद बाबां यांच्या ४०७ व्या संदल-उरूस, यात्रा उत्सव निमित्त शुक्रवार दि.०७ मार्च, कुरान खाणी (कुराण पठण), दि.०८ मार्च रोजी रात्री ९.३०. वा. गुजरात चे सुप्रसिद्ध कव्वाल सिराज चिश्ती यांचा जंगी कव्वाली (भक्तीगित) कार्यक्रम., तसेच रात्री ११ वा. संदल (चंदन), गुस्लखानी, चिराग-ए-रोशन, कार्यक्रम, महाप्रसाद, दि.०९ रोजी सायंकाळी लंगरखाना, महाप्रसाद, मिलाद शरिफ (प्रवचण), बाबांच्या कार्याची माहिती देणे.तर दि.१० रोजी उरुस (यात्रा) जियारत, भाविक भक्त बाबांच्या कबरीवर फुलांची व कापडी गलफ चादर, मलिदा, गुळ, पेढा, नारळ, प्रसाद शेरणी काढत अर्पण करतात. दि.११ - दुपारी २ वाजता कुस्त्यांचा जंगी हगामा (आखाडा) कार्यक्रम संपन्न हेणार आहेत. सर्व कार्यक्रमाचा भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन शेख महंमद बाबा दर्गाह ट्रस्ट च्या वतीने करण्यात आले आहे. यावेळी ट्रस्टचे बंडूभाई शेख,अल्लीभाई शेख,राजुभाई शेख,अजीजभाई शेख,राजू भाई शेख,चांदभाई शेख,शाहरुख शेख,ताशेख,सोहेल शेख,रेहान शेख,अरमान शेख,सुफियान शेख आदींसह उपस्थित होते.

# बोर्डऐवजी सीबीएससीची आली प्रश्नपत्रिका,२५ विद्यार्थ्यांचे नुकसान

## धनेगाव केंद्रावर इंग्रजीच्या पेपरचा घोळ; जबाबदार कोण?



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**निलंगा । इस्माईल महेबूब शेख**

सिसीटीव्हीच्या नजरेखाली व बैठे पथकाच्या उपस्थितीत पार पडत असलेल्या दहावीच्या इंग्रजी विषयाच्या प्रश्नपत्रिकेत घोळ झाला आहे. याचा फटका एका हॉलमधील विद्यार्थी यांना बसल्याने याला जबाबदार कोण अशी चर्चा विद्यार्थ्यांसह पालकातुन होत आहे.

धनेगाव येथील श्री महादेव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात दहावी परिक्षा चे केंद्र आहे. या केंद्रावर धनेगाव

सह नागाबुवा विद्यालय, हेळंब व सौ. मिरा माध्यमिक विद्यालय जवळगा येथीलआहे एकुण १९९ परिक्षार्थी परिक्षा देत आहेत.

शनिवारी सकाळी इंग्रजी विषयाचा पेपर होता. यावेळीन या केंद्रावर इंग्रजी तृतीय भाषा असताना सात नंबरच्या हॉलमधील तब्बल पंचेवीस विद्यार्थ्यांना इंग्रजी प्रथम भाषा (सीबीएसई) ची प्रश्नपत्रिका दिली गेली. पुर्ण हॉलवर एकच प्रश्नपत्रिका असल्याने पेपर अवघड असल्याचा क्यास परिक्षार्थी यांनी बांधला. पण पेपर सुटल्यावर बाहेर आल्यानंतर खात्री केल्यानंतर इतर पेपर वेगळा असल्याचे निदर्शनास आले. अन विद्यार्थी अवाक् झाले. विद्यार्थ्याच्या हॉलटिकिटवर इंग्रजी तृतीय भाषा असा स्पष्ट उल्लेख असताना व इंग्रजी प्रथम भाषा नसताना ह्या प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांच्या माथी कशा मारल्या हा संशोधनाचा विषय आहे एकंदरीत एक पेपर असताना दुसरीच प्रश्नपत्रिका कशी दिली गेली. याचा फटका मात्र त्या हॉलवरील २५ विद्यार्थ्यांना बसला हे मात्र कोणीही नाकारू शकत नाही. या बाबीला जबाबदार कोण? याची चौकशी करावी अशी मागणी विद्यार्थ्यांसह पालकांनी केली आहे.

### चुकीची दुरुस्ती झाली होती...

**शाळेच्या प्रशासनाने सांगितले की, चुकीने दोन विद्यार्थी इंग्रजी प्रथम भाषा म्हणून बोर्डाकडे नोंद झाली होती. ती दुरुस्त करुन इंग्रजी तृतीय भाषा अशी नोंद झाली. पण पेपर मात्र इंग्रजी प्रथम भाषेचे आले. यामुळेच हा घोळ झाला आहे असे सांगितले.**

**आमच्याकडे इंग्रजी प्रथम भाषेचे विद्यार्थी नाहीत : याबाबत केंद्र संचालक सी.एस. बंडगर यांच्याशी संपर्क साधला असता आमच्या केंद्र- ावर इंग्रजी प्रथम भाषेचे विद्यार्थीच नाहीत तर बोडार्ने ह्या प्रश्नपत्रिका दिल्या कशा असा सवाल उपस्थित केला.**

### प्रथम भाषेचे दोनच विद्यार्थी

**धनेगाव येथील परिक्षा केंद्रावर दहावीच्या परिक्षा साठी दोन विद्यार्थी इंग्रजी प्रथम भाषेचे दोन विद्यार्थी आहेत. या दोन विद्यार्थ्यांसाठी बैठक व्यवस्था वेगळी केली होती. त्यांचे पेपर इतर विद्यार्थी यांना दिले असतील असे प्रभारी गटशिक्षणाधिकारी : संजय शिंदाळकर यांनी सांगितले.**

# बाबासाहेब पोटभरे महाराष्ट्ररत्न गौरव पुरस्काराने सन्मानित



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशन येथे कार्यरत असणारे पोलीस हेडकॉन्स्टेबल बाबासाहेब पोटभरे यांना विश्वनाथ फाउंडेशन च्या वतीने सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्ररत्न गौरव पुरस्कार सिने अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

बाबासाहेब पोटभरे हे पोलीस दलामध्ये उत्कृष्ट सेवा तर देतच आहेत पण आपल्याला समाजाचे काहीतरी देणे लागते या हेतूने स्वखर्चाने वृक्षारोपण करणे, जखमी प्राण्यांवर उपचार करणे, गरीब असाह्य लोकांची सेवा करणे, शेती तरसामाजिक कार्यात देखील हिरीरीने सहभाग घेत असतात.महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ५० सत्कारमूर्तींचा महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२५ हा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.विश्वनाथ फाउंडेशन, दैनिक सुधाकर आणि इन्फोइड टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड च्या संयुक्त विद्यमाने सावित्रीबाई फुले स्मारक गंजपेठ पुणे येथे २८ फेब्रुवारी २०२५ रोजी या भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते या पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन शंकर चव्हाण यांनी केले होते या कार्यक्रमासाठी प्रमुख उद्घाटक म्हणून प्रसिद्ध सिने अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड या उपस्थित होत्या प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध सेने दिग्दर्शक ओमकार माने व इतर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सन्मानाबद्दल अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विनोद घोळवे, वाहतूक विभागाचे घोडके साहेब, पोलीस हेड कॉन्स्टेबल बाबासाहेब आचार्य, पोलीस हेड कॉन्स्टेबल भोले साहेब, इत्यादीने अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# रमजान महिन्यात महावितरण कंपनीने लोडशेडींग करु नये-शे.जब्बार शे.अहमद

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**किनवट । दशरथ आंबेकर**



किनवट तालुक्यातील ईस्लापुर , सर्कल शिवनी, अप्पारावपेट मध्ये रमजान महिन्यात महावितरण कंपनीने लोडशेडींगचा लपंडाव करु नये अशा प्रकारचे निवेदन ईस्लापुर व शिवनी येथील मुस्लिम बांधवांनी दिले. येत्या ०२ मार्चपासून ते १ एप्रिल पर्यंत रमजान महिना सुरू आहे रमजान महिना मुस्लिम बांधवांचा पवित्र महिना असतो पहाटेच उठून उपवासाची तयारी करावी लागते. त्यामुळे या महिन्यात महावितरण विधुत कंपनीने लोडशेडींग करु नये अशी मागणी मुस्लिम शिष्टमंडळाने महावितरण शाखा अभियंता ईस्लापुर यांच्या कडे केली आहे ईस्लापुर व शिवनी सर्कल मध्ये वीज पुरवठा सुरळीत ठेवावा या कालावधीत लोडशेडींग करु नये अशी मागणी ईस्लापुर शाखा अभियंता यांच्या कडे केली आहे.

# भारतीय सैन्यदलातून सेवानिवृत्त झालेल्या जवानाचा गोळेगाव येथे सत्कार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**





गोळेगाव नगरीचे भूमिपुत्र विजय हाणमंतराव कदम यांनी भारतीय सैन्य दलात १७ वर्षे देशातील जम्मू-काश्मीर, आसाम यासह विविध राज्यात देशसेवा केली आहे. ते याच महिन्यात सैन्यदलातून निवृत्त झाले आहेत. गावाच्या सुपुत्राने देशाचे रक्षण केल्याचा अभिमान असल्याने त्यांचा आदर्श गावातील नव्या उमेदीच्या तरूण पिढीने घ्यायला हवा, या हेतूने तसेच सेवानिवृत्त सैनिकाप्रती आणि भारतीय सैन्यात आपली सेवा देणाऱ्या तमाम सैनिकांप्रति आपली कृतज्ञता व्यक्त होईल, म्हणून त्यांचा सन्मान करण्याचे ग्रामस्थांनी ठरविले होते. त्यानुसार गोळेगाव गावातील प्रतिष्ठीत मंडळींच्या हस्ते सेवानिवृत्त सैनिक विजय कदम यांचा गावातील प्रमूख रस्त्याने मिरवणुक काढून त्यांचा सत्कार करण्यात आला. घरोघरी विविध सण, उत्सव साजरे होत असतात. मात्र, देशाच्या सीमेवर लढणाऱ्या जवानांना कुठलाही सण नाही की उत्सव नाही, देशाची सुरक्षा करणे हेच एकमेव ध्येय त्यांच्यासमोर असते. विजय कदम हे १७ वर्षे देशाची सेवा करून निवृत्त झाले. ही गावकऱ्यांसाठी खूपच अभिमानाची गोष्ट आहे, असे गावकऱ्यांनी म्हटले आहे. यावेळी उपस्थित चेअरमन रामचंद्र पाटील, दत्ता वराडे(पोलिस पाटील) , मारोती पाटील, हणमंत सर्जे, रमेश सावंत, नारायण करपे, प्रकाश पुणेबाईनवाड ,योगेश जाधव , चांद शेख, बाबाराव बोबडे, शिवा चिंतलवाड, मनोज मठपती आदि जनाची उपस्थिती होती..

# खा.डॉ.श्रीकांतजी शिंदे व खा.राहुलजी शेवाळे यांचे नांदेड विमानतळावर शिवसेनेच्या वतीने जंगी स्वागत संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । गोविंद मोरे**

मा. उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या शिवसेनेचे महाराष्ट्राचे युवानेतृत्व तथा कल्याण लोकसभेचे लोकप्रिय खासदार डॉ.श्रीकांतजी शिंदे साहेब व शिवसेना उपनेते तथा मा.खासदार राहुलजी शेवाळे नांदेड दौऱ्यावर आले असताना नांदेड विमानतळावर त्यांचे स्वागत करताना मंत्री तथा विधानपरिषद गटनेते आमदार ना.हेमंतभाऊ पाटील,आमदार बालाजीराव कल्याणकर, आमदार आनंदराव पाटील बोंढारकर,आमदार बाबुराव कदम कोहळीकर,शिवसेना जिल्हाप्रमुख उमेश मुंडे, जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे, गंगाधर बडुरे, विवेक देशमुख यांच्यासह अनेक शिवसेना उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे गटाचे नेते,पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.. अशी माहिती आमच्या प्रतिनिधींशी बोलताना नांदेड दक्षिण विधानसभेचे लोकप्रिय आमदार आनंदराव पाटील बोंढारकर साहेब यांनी दिली आहे.





# दिव्यांगांच्या वतीने पोलिस प्रशासनाचे आभार ;उपमुख्यमंत्री अजित पवार यांची विमानतळावर घडून आणली भेट

लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । गौतम बनसोडे




राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार हे नांदेड जिल्हा दौऱ्यावर आले असता पोलीस प्रशासनाच्या वतीने विमानतळ येथे बेरोजगार दिव्यांग कल्याणकृती संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाची भेट घडवून विविध मागण्यांचे स्विकारल्या बद्दल पोलिस प्रशासनाचे व अजितदादा पवार यांचे बेरोजगार दिव्यांग कल्याणकृती संघर्ष समितीच्या वतीने आज आभार मानण्यात आले.

बेरोजगार दिव्यांग कल्याणकृती संघर्ष समितीच्या विविध मागण्यांसंदर्भात वारंवार जिल्हा प्रशासनाला निवेदने देऊन आंदोलने उपोषणे करून मोर्चे काढूनही मागण्या मान्य झाल्या नाहीत तसेच वारंवार याबाबत खासदार आमदारांनाही निवेदने देण्यात आले परंतु या मागण्यांची दखल न घेतल्यामुळे बेरोजगार दिव्यांग कल्याणकृती संघर्ष समितीच्या वतीने राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना घेराव घालण्यात येणार असल्याचे निवेदन जिल्हा प्रशासनाला दिल्यानंतर पोलीस प्रशासन व जिल्हा प्रशासन हादरून गेले होते परंतु पोलीस प्रशासनाच्या वतीने दिनांक २७ फेब्रुवारी रोजी शिवाजीनगर पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक तांदळे यांनी पोलिस अधीक्षक अबिनाशकुमार. अप्पर पोलिस अधीक्षक सुरज गुरव, इतवारा विभागाचे उपविभागीय पोलिस अधिकारी सुशीलकुमार नायक यांच्याशी सकारात्मक चर्चा घडवून आणली. बेरोजगार दिव्यांग कल्याणकृती संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाने पोलिस अधीक्षक, अप्पर पोलीस अधीक्षक आणि इतवारा उपविभागीय पोलिस अधिकारी आणि शिवाजीनगर पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांच्या शब्दाचा मान ठेवला तदनंतर दिनांक २८ फेब्रुवारी रोजी श्री गुरुगोविंदसिंघजी विमानतळ नांदेड येथे तीन पोलीस व्हॅनच्या माध्यमातून जवळपास १८ ते १९ दिव्यांग बांधव आणि भगिनींना स्वतंत्र पासेसची व्यवस्था करून देत पोलिस प्रशासनाने उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजितदादा पवार यांची जवळपास पंधरा मिनिटे भेट घडवून देत चर्चा घडवली व मागण्यांचे निवेदन सुपुर्त केले.त्याबद्दल जिल्हा प्रशासन, पोलिस प्रशासन व पत्रकार बांधवांचे आज बेरोजगार दिव्यांग कल्याणकृती संघर्ष समितीच्या वतीने समीतीचे अध्यक्ष राहुल साळवे यांनी आभार व्यक्त केले आहे.

# आंतरराष्ट्रीय कथा प्रवक्ते देवकीनंदन ठाकूर महाराज यांचे प्रतिपादन

## देश आणि धर्माच्या रक्षणासाठी सनातन बोर्ड निर्माण करणे आवश्यक!




लोकनेता न्यूज नेटवर्क


कंधार । धोंडीबा मुंडे

देश आणि धर्माच्या रक्षणासाठी सनातन बोर्ड निर्माण करणे आवश्यक.हाबोर्ड सनातन संस्कृतीचे रक्षण करेल आणि येणाऱ्या पिढ्यांसाठी उपयुक्त ठरेल. वक्फ बोर्ड असू शकतो, तर सनातन बोर्ड का होऊ शकत नाही ? असेही ते म्हणाले,पुढे बोलताना म्हणाले,पैसा सर्वस्व नाही,कुंटूबाला वेळ द्या तुमच्या मुलाबाळांना शिक्षण दया चांगले संस्कार द्या असे प्रतिपादन वृंदावनचे आंतरराष्ट्रीय कथा प्रवक्ते देवकीनंदनजी ठाकूर महाराज यांनी श्रीक्षेत्र उमरज येथे आयोजित श्रीमद् भागवत कथेत केले.यावेळी हजारो भाविक भक्तांची उपस्थिती होती.

श्रीक्षेत्र उमरज संस्थानच्या वतीने आयोजित श्रीमद् भागवत कथेला सुरूवात दि. २७ फेब्रुवारी पासून झाली

> श्रीक्षेत्र उमरज येथे लातूरचे खासदार म्हणाले कि क दर्जा मधून ब दर्जामध्ये नेण्याचा प्रयत्न करतो, येणाऱ्या काळात सदरील कामासाठी सोयी सुविधा उपलब्ध करण्याचा प्रयत्न करेल असे प्रतिपादन लातूरचे खा.डॉ.शिवाजी काळगे म्हणाले,यावेळी श्रीसंत नामदेव महाराज संस्थानचे मठाधिपती महंत एकनाथ महाराज, मुखेड चे आमदार तुषार राठोड, कंधार लोहा मा.आ ईश्वरराव भोसीकर,राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते ड.मुक्तेश्वर धोंडगे,माधवराव पेठकर,माजी नगरसेवक शोभाताई नळगे, माजी जि.प.सदस्य संध्याताई धोंडगे,माजी नगरसेवक गणेश कुंटेवार,बालाजी चुकलवाड,माजी नगरसेविका वर्षाताई कुंटेवार,उमरजचे सरपंच जयश्री केंद्रे आदींसह हजारों भाविक भक्तांची उपस्थिती होती.

आहे,देवकीनंदन ठाकूर महाराज यांच्या कथा श्रवणाला भाविक भक्तांची अलोट गर्दी उसळली आहे,आपल्या रसाळ व मधाळ कथेतून त्यांनी तुमच्या लेकरांचे पालन पोषण करता तसे धर्माचे पालन करणे हे तुमचे कर्तव्य आहे.आईच्या चित्तात सदैव आपल्या लेकराचे हितच असते.केवळ आपल्या लेकराचे कल्याण व्हावे यासाठी रात्रंदिवस ती कष्ट करून त्याला जपत असते ती माता असते.वेळ प्रसंगी स्वतःचा जीव गेला तरी चालेल पण माझं बाळ वाचलं पाहिजे यासाठी तळमळत राहणारी म्हणजे ती आई असते.त्याचप्रमाणे संतही वेळप्रसंगी आपला जीव धोक्यात घालतात परंतु माणूस हा माणूस बनून राहिला पाहिजे आणि देवाचा लाडका झाला पाहिजे यासाठी रात्रंदिवस तळमळत असतात. आई आणि संत एकच असतात म्हणून देवकीनंदनजी ठाकूर महाराज यांनी श्री क्षेत्र उमरज येथे आयोजित श्रीमद् भागवत कथा वाचन करताना केले.पुढे म्हणाले की देवकीनंदन ठाकूर यांनी सनातन धर्माच्या रक्षणासाठी सनातन बोर्डाच्या गठनाची गरज व्यक्त केली आहे. त्यांनी सांगितले आहे की, हाबोर्ड सनातन संस्कृतीचे रक्षण करेल आणि येणाऱ्या पिढ्यांसाठी उपयुक्त ठरेल. वक्फ बोर्ड असू शकतो, तर सनातन बोर्ड का होऊ शकत नाही ?असेही ते म्हणाले . धर्म आणि देशाच्या रक्षणासाठी सनातन बोर्डाचे निर्माण करणे आवश्यक आहे असेही महाराज म्हणाले,तसेच धर्माची रक्षा करते वेळी काही बंधन आले,तर ते तोडून टाका व धर्माची रक्षा करा,देवकीनंदनजी ठाकूर महाराज यांनी श्री क्षेत्र उमरज येथे आयोजित श्रीमद् भागवत कथा वाचन करताना केले.



नांदेड जिल्ह्याचे लोककल्याणकरी नेते श्री मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांनी दैनिक गाववालाचे तालुका प्रतिनिधी पांडुरंग सोनकांबळे यांच्या वाढदिवसा निमित्त सन्मान करुन शुभेच्छा देताना.यावेळी पत्रकार प्रल्हाद हिवराळे, फिरोज पटेल बळेगावकर, दादाराव पाटील पवळे उपस्थित होते(लोकनेता न्युज नेटवर्क नांदेड)



भारतीय सैनिकी सेवेत सेवानिवृत्त झाल्याने श्री.विजय हनुमंतराव कदम यांचा नांदेड जिल्ह्याचे लोककल्याणकारी शेतकरी नेते मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांनी गोळेगाव ता.उमरी या गावात जाऊन सन्मान करताना, यावेळी गावात मोठ्या संख्येने गावकरी उपस्थित होते.(लोकनेता न्युज नेटवर्क नांदेड


डॉ.श्रद्धा पुयेड पाटील यांची मेडिकल ऑफिसर म्हणून किनवट येथील शासकीय वैद्यकीय दवाखाना येथे नियुक्ती झाल्याबद्दल मंत्री तथा विधान परीषद सदस्य गटनेते आ.हेमंतभाऊ पाटील साहेब यांनी सत्कार करून पुढील भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. (लोकनेता न्युज नेटवर्क नांदेड)



# समाधानी पिढी आता आपल्याला सोडून जातेय

लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । किरणं पाटील वडजे



येत्या दहा–पंधरा वर्षांमधे एक आधीची पिढी हे जग सोडणार आहे. कटू असलं तरी हे सत्य आहे, कारण हे जग कोणी थांबवू शकत नाही. या पिढीतले लोकं थोडे वेगळेच आहेत ! सकाळी लवकर उठणारे, रात्री वेळेवर झोपणारे, पाणी वाया न घालवता झाडाला घालणारे, फुलं देवासाठी तोडणारे, रोज पूजा करणारे, मंदिरात एखादी फेरी मारणारे, रस्त्यातून भेटणाऱ्याची आस्थेने चौकशी करणारे, दोन्ही हात छातीशी नेऊन नमस्कार करणारे, अन्न धान्य वाया जाऊ नये म्हणून बेतानेच स्वयंपाक करणारे ; आणि तरीही उरलं तर गरीबाला देणारे किंवा दुसऱ्या दिवशी त्याला नटवून मिटक्या मारत खाणारे! पाहुणे–रावळ्यांची स्वतःची गैरसोय असूनही पाहुणचार करणारे, आपापले सण धांगडधिंगा न करता साधेपणाने साजरे करणारे, व्यसन करताना लाजणारे आणि समाजाच्या नजरेची भीड बाळगणारे, जुना झालेला चष्मा तुटला तर चिकटवून, जुनी चप्पल फाटली तर शिवून आणि जुना बनियन गलितगात्र होईपर्यंत वापरणारे, उन्हाळ्यात पापड वाळवणारे, हात दुखेपर्यंत – कुटून मसाला घरी बनवणारे, फक्त बाहेर घालायच्या कपड्यांनाच इस्त्री करणारे, खिशातला पैसा जपून वापरणारे आणि शक्यतो घरीच जेवणारे! असे लोकं आता हळूहळू हे जग सोडून चालले आहेत! ते जातील तेव्हा एक महत्वाची शिकवण त्यांचेबरोबरच जाईल! समाधानी, साधे, अर्थपूर्ण, दुसऱ्यांना प्रेरणा देणारं आणि समोरच्याची काळजी करणारं जीवन जगायचं असतं ही शिकवण ह्या जगातून कायमचीच नाहीशी होईल! नेतृत्व कर्तृत्व व स्वाभिमान ही त्याच्या बरोबर च संपेल की काय? त्यानंतर राहील फक्त स्वार्थ, अविश्वास, चैन, वखवख, असंवेदनशील मनं, भकास कोडगेपणा आणि मोबाईलवरचे कृत्रिम अगत्य; अन् सारं आभासी तथाकथित जीवन ! कटू आहे पण हेच सत्य आहे !

# जिजाऊ ज्ञानमंदिरच्या विद्यार्थ्यांनी घेतला सहलीचा मनमुराद आनंद

लोकनेता न्यूज नेटवर्क

मुखेड । शिवकुमार बिरादार



शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांसाठी व त्यांच्या आवडीसाठी प्रथम प्राधान्य क्रम देणारी शाळा म्हणून ज्या शाळेचा उल्लेख केला जातो ती शाळा म्हणजे मुखेड शहरातील जिजाऊ ज्ञानमंदिर ही शाळा . शनिवार दि. १ मार्च रोजी सकाळी ९ वाजता जिजाऊ ज्ञानमंदिर सेमी इंग्लिश स्कूलची सन २०२५ ची शैक्षणिक सहल मराठवाड्यातील पंचक्रोशीत सुप्रसिद्ध असलेल्या खडकाळ माळरानावर नंदनवन फुलविलेल्या निसर्गरम्य अशा चाकूर येथील वृंदावन अम्यूजमेंट न्ड वॉटर पार्क ला भेट देण्यासाठी निघाली. साडे दहा च्या दरम्यान आम्ही तेथे पोहचलो. सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे अम्यूजमेंट पार्क व वॉटर पार्क असे दोन गटात विभागले होते. तर काही विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार दोन्ही पार्कमध्ये खेळण्याचा अट्टाहास होता. त्यानुसार विद्यार्थ्यांचे तीन गटात विभागणी करण्यात आली. गाडीवाईज व पार्कवाईज गट पाडून त्यांच्या गटप्रमुखाच्या मार्गदर्शनाखाली देखरेख ठेवण्यात आली. अमेजमेंट पार्कमध्ये रेल्वे , बोटींग, डॅश कार , आकाश पाळणा , रोपवे आदी खेळण्यांचा विद्यार्थ्यांनी मनमुराद आनंद लुटला. तर वॉटरपार्क मध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी डिजेच्या तालावर समूद्रीलाटा चा अनुभव घेत रेनडॉन्स करत यथेच्छ आनंद लुटला. जिजाऊ ज्ञानमंदिर स्कूल चे प्राचार्य जगदीप जोगदंड यांच्या कुशल नेतृत्वाखाली पर्यवेक्षक सुधाकर जोगदंड यांच्या सुनियोजित मार्गदर्शनाखाली तीन गटात विभागणी करून शिक्षक गटप्रमुखांच्या देखरेखीखाली शिस्तबद्ध पद्धतीने विद्यार्थी गटावर नियंत्रण ठेवून खेळवून विविध खेळणीव्दारे खेळण्यातला आनंद देण्याचा प्रयत्न केला. यावेळी जवळपास ३६९ विद्यार्थ्यांनी आपापल्या आवडी निवडीप्रमाणे या शैक्षणिक सहलीचा आनंद घेतला. यावेळी वॉटर पार्क गटाकडे विशेष लक्ष ठेवण्यासाठी संस्थेचे कोषाध्यक्ष जगदीश जोगदंड सर , प्रा. नागनाथ कांबळे सर, कुरेशी सर , सौ. अनिता शिंदे मॅडम, सौ. सुरेखा राठोड मॅडम, दत्तात्रय इंगोले सर , संजय चौडेकर यांच्यासह सर्व वाहनचालक , या कामी उपस्थित होते. तर अम्यूजमेंट पार्क विभागाकडे विद्यार्थी गटावर लक्ष ठेवण्यासाठी स्वतः संचालक ज्ञानोबा जोगदंड सर, प्राचार्य जगदीप जोगदंड सर, पर्यवेक्षक सुधाकर जोगदंड सर , यमेकर सर ,शितल जोगदंड मॅडम , पोतदार मॅडम, जाधव मॅडम , गीते मॅडम , शिवमाला पेड मॅडम, कळसकर मावशी सह इतर वाहनचालक उपस्थित होते.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904